शब्दांना सत्याची धार
प्रहार

# गुणवत्तापूर्ण संशोधनातून सामाजिक भान जपूया - संगीता पाटील

राजापूर (वार्ताहर)

समाजाविषयी सदैव उत्तरदायित्वाची भावना जागृत ठेवून गुणवत्तापूर्ण संशोधन कार्यातून सामाजिक भान जपूया, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागीय चेअरमन संगीता पाटील यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या आबासाहेब मराठे सामाजिक शास्त्रे आणि मानव्यविद्या शाखामधील संशोधन पद्धती या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या प्रमुख उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. या कार्यशाळेचे आयोजन २१ ऑगस्ट रोजी आभासी पद्धतीने करण्यात आले.

प्रास्ताविक व स्वागत संशोधन समितीचे प्रमुख डॉ. हेमंत अकोलकर यांनी केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रा.डॉ. प्रविण जाधव, प्रमुख,सामाजिक शास्त्रे व मानवविद्या विभाग, इन्स्टिट्यूट ऑफ इन्फ्रास्ट्रक्चर व टेक्नोलॉजी रिसर्च व मॅनेजमेंट,अहमदाबाद, गुजरात यांनी 'प्रभावी ICSSR संशोधन प्रकल्प प्रस्ताव कसा तयार करावा' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात प्रा.(डॉ) विजय कुंभार, प्रभारी कुलसचिव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा यांनी 'मानवविद्या व सामाजिक शास्त्रांमधील संशोधनातील उत्कृष्टता' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ.राजाराम राठोड यांनी महाविद्यालयात संशोधनाची संस्कृती अधिक बळकट करण्यासाठी प्राध्यापक,संशोधक व विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

Ratnagiri Edition
Aug, 22 2026 Page No, 8
https://epaper.prahaar.in